राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४

Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र: तंशिविकापु/आस्था-३(अ)/दिव्यांग उपकरणे/२०२०/ 2036 दिनांक : 29 APR 2021

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये

**विषय :- शासकीय /निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले/होणा-या अंध/क्षीणदृष्टी/कर्णकधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत**

संदर्भ – १ संचालनालयाचे पत्र क्र १६/आस्था/दिव्यांग उपकरणे/२०२१/१२९दिनांक १९/०४/२०२१
२. सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२१/प्र.क्र३२/दि.क २, दिनाक ०१/०२/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. त्यांचे अवलोकन करण्यात यावे त्यानुसार कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था/कार्यालये यांनी संदर्भीकित शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार दिव्यांग कर्मचा-यांना पुरवावयाचे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे संस्था स्तरावर मागणीनुसार खरेदी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत- वरील प्रमाणे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

3. महापालिका मार्ग. पत्र पेटी क्र.1967. मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597436.
ई-मेल- desk16@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

पत्र क्रमांक : १६/आस्था/दिव्यांग उपकरणे/२०२१/१३९ दिनांक : १९।४।२०२१

**ईमेलव्दारे**

प्रति.

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय.
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : **शासकीय / निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले/होणा-या अंध/क्षीणदृष्टी/कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून देणेबाबत.**

**संदर्भ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०१२/ प्र.क्र.३२/दि.क.२, दिनांक १.२.२०२१**

उपरोक्त विषयाबाबतच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा संदर्भांकित शासन निर्णयानुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या आस्थापनेवरील दिव्यांग कर्मचा-यांना पुरवावयाचे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे याबाबतचा खर्च त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा तसेच संबंधीत आस्थापनेने दिव्यांग कर्मचा-यांना मागणीनुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनाक १.१२.२०१६ नुसार तसेच वित्त विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदीपध्दतीचा अवलंब करून GEMS प्रणालीव्दारे BIS प्रमाणीत केलेली साधने व उपकरणे उपलब्ध करून द्यावी.

सदर प्रकरणी असे नमूद करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त सर्व संस्था व कार्यालये यांची GEM संकेतस्थळावर नोंदणी करून प्रत्येक संस्थेला GEMS वरून खरेदीसाठी Username व Password प्राप्त करून दिलेले आहेत. त्यामुळे संस्थेस संस्था स्तरावर मागणीनुसार खरेदीची कार्यवाही करणे शक्य आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भांकित शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार दिव्यांग कर्मचा-यांना पुरवावयाचे सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे मागणीनुसार खरेदी करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई.
23 APR 2021
आवक क्र. ......3400......

**( डॉ. अभय वाघ )**
**संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

E/mansi/mansi/sankirn/sankirnLTR2020(march onwards)